# राष्ट्रीय सेवा योजना
# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# व
# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.
# यांच्या संयुक्त विद्यमाने 'एकदिवशीय मूल्यशिक्षण कार्यशाळा'
# अहवाल

---

**विषय – ''भारतीय विकसीनतेत युवकांची जबाबदारी व कर्तव्य''**

कार्यशाळा दिनांक – २२ फेब्रुवारी २०२४ वेळ : स. ११ ते सायं. ६ सत्र –२

पहिले सत्र

**व्याख्याते – मा.श्री. गणेश शिंदे (तहसिलदार, बारामती)**

**उपविषय – भारतीय विकसिनशीलतेत लोकशाही व लोकशाही बळकटीसाठी मतदार, मतदान नाव नोंदणीचे महत्व**

दुसरे सत्र

**व्याख्याते – मा.श्री. गणेश निमसे (रा.से.यो. जिल्हा समन्वयक, अहमदनगर जिल्हा)**

**उपविषय – ''भारतीय विकसीनतेत युवकांची जबाबदारी व कर्तव्य''**

---

**राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.**यांच्या संयुक्त विद्यमानाने

महाविद्यालयात दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ रोजी, विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबर मूल्य शिक्षण व त्याच महत्त्व याची जानीव व जागृती होण्याचा दृष्टीकोनातून मा. प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनात, भारतरत्न डॉ.ऐ.पी.जी कलाम यांचे स्वप्न साकार करण्याचा मुख्य हेतु समोर ठेऊन सदर कार्यशाळेचे आयोजन ''भारतीय विकसनशीलतेत युवकांचे कर्तव्य जबाबदारी'' या विषयावर जीवराज सभागृह येथे मूल्य शिक्षणांतर्गत ''भारतीय विकसीनतेत युवकांचे जबाबदारी व कर्तव्य'' या विषयावर एक दिवसीय विद्यापीठ स्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेत बारामती परिसरातील विविध महाविद्यालयातील व पुणे, नगर येथून एकूण ३३४ स्वयंसेवक सहभागी झाले होते. कार्यशाळेचे आयोजन दोन सत्रात विभागून करण्यात आली होती. पहिले सत्र सकाळी ११ ते १ या वेळेत व दुसरे सत्र दुपारी ३ ते ५ यावेळेत आयोजित करण्यात आले होते. तसेच सहभागी स्वयंसेवकांना मतदार जनजागृती याविषयावर पंचायत समिती,

बारामती शिक्षण विभाग अंतर्गत बारामती परिसरातील शिक्षक वृंदांनी मतदान जनजागृतीवर संगीत संध्येचे सादरीकरण आयोजित करण्यात आले होते.

या कार्यशाळेस  मा. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांची अध्यक्षता तसेच उद्घाटक म्हणून मा. श्री. गणेश शिंदे तहसीलदार बारामती तर प्रमुख पाहुणे प्रा डॉ.गणेश निमसे (रा.से यो.जिल्हा समन्वयक, अहमदनगर ) ,उपप्राचार्य डॉ.अशोक काळंगे, रजिस्ट्रार श्री.अभिनंदन शहा यांच्या सह पुणे, अहमदनगर, नाशिक येथून आलेल्या विद्यार्थी सहभागातून संपन्न झाली.

या प्रसंगी प्रथम सत्रात मा.श्री. गणेश शिंदे, तहसिलदार, बारामती यांनी भारतीय विकसनशीलतेला चालणा मिळण्यासाठी चांगली  धोरणात्मक निर्णय घेण्याची यंत्रणा हि उभी करण्यासाठी मतदान  व नवमतदार  नोंद याचेच महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देन्यात आले. तसेच सहभागी विद्यार्थ्यांनी मतदान करण्याची शपथ घेवून तहसिलदार साहेबांना अश्वस्थ केले.  बारामती पंचायत समिती शिक्षण विभाग यांच्या मार्फत मतदान विशेष संस्कृतीक कार्यक्रम बरोबर महाविद्यालयातील रा.से.यो स्वयंसेवक सेवकांनी सादर केलेल मतदान जनजागृती पथनाट्य विशेष आकर्षण ठरले.

या कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात प्रा. गणेश निमसे, जिल्हा समन्वयक रा.से.यो., अहमदनगर यांनी भारतीय विकसिनशीलतेत खंडप्राय व भाषा व संवाद आणि त्याविषयीचे असणारे मूल्य, त्याचबरोबर स्वयंसेवकांनी सामाजिक जबाबदारीबरोबर स्वत:च्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी करावयाची कर्तव्ये व जबाबदारी याचे भान ठेवून, धार्मिक सांप्रदायिक वाद रोखून अध्यात्मिक वाटचाल करावी. उपलब्ध संत साहित्याचे चिकीत्सक भावनेतून वाचन करुन त्याविषयी चिंतन करण्यात वेळ द्यावा. सध्याच्या काळातील मोबाईल व डिजीटल माध्यमाचा फोफावणारा स्वैराचारास बळी न पडता. प्राथमिक कर्तव्यांकडे सजगतेने पहावे, असे आवाहन केले.

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव मिलिंद शहा (वाघोलीकर), रजिस्टार अभिनंदन शहा, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ.अशोक काळंगे, डॉ.सचिन गाडेकर, डॉ.योगिनी मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. विलास कर्डिले, कार्यक्रम अधिकारी डॉ. चंद्रकांत कांबळे, कार्यक्रम अधिकारी डॉ. निरंजन शहा, सर्व सहयोगी कार्यक्रम आधिकारी , सर्व सद्यस्य रा.से.यो विभाग यांनीं विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रम अधिकारी

प्राचार्य

## कार्यशाळेतील प्रमुख छायाचित्रे
## मूल्यशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन सोहळा मा.गणेश शिंदे, तहसिलदार, बारामती यांच्या हस्ते व त्यांचे मार्गदर्शन






प्रमुख पाहुण्यांचा स्वागत

मूल्यशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटन सोहळयाचे आभार प्रदर्शन







मतदान जनजागृतीसाठी शपथ






# कार्यशाळेतील प्रमुख छायाचित्रे

दुसऱ्या सत्रातील मार्गदर्शक प्रा.गणेश निमसे यांचे व्याख्यान




प्रा.गणेश निमसे यांचे हस्ते सहभागी स्वंयसेवकांना प्रमाणपत्र वाटप




मतदान जनजागृती पथनाटय सादर करताना विद्यार्थी




सहभागी स्वंयसेवकांचा सामुहिक छायाचित्र




पं.सा. बारामती शैक्षणिक विभागातर्फे मतदार जनजागृती संगीत रजनी




स्वीप अधिकाऱ्यांसह आयोजकांचे छायाचित्र

